THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 24TH MAY 1894.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थान सरकार.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल ह्यांनीं तारीख १० माहे मार्चे सन १८९४ रोजीं पसंत केला; तो लोकांस जाहीर होण्यासाठीं ह्यावरून प्रसिद्ध केला असे :—

### सन १८९४ चा आक्ट नंबर ८.

## सन १८९४ चा हिंदुस्थानचा तारिफासंबंधीं आक्ट.

### अनुक्रमणिका.

१. सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

२. रद्द करण्याबाबद.

३. परिशिष्टांत सांगितलेल्या जकाती वसूल करावयाच्या.

४. कोचिनांतून मिरीं बाहेर पाठविण्याबाबद.

५. विवक्षित सरहद्दीवरून येणाऱ्या जाणाऱ्या मालावर जकात.

६. सन १८६३ चा आक्ट १६ वा, कलम १, ह्याची सुधारणा.

७. सर्टिफिकेटाचा आधार असलेल्या गाळलेल्या दारूवर, अफिणीवर व मिठावर जकात.

८. जकातींबाबदचे व मालाबाबदचे कित्येक ठराव लागू करणें.

९. जाहिरनामे रद्द करण्याचा अधिकार.

१०. करार केल्यानंतर जकात जास्त करण्यांत आल्यास, जास्त केलेली जकात मिळवावी, अगर ती कमी करण्यांत आल्यास कमी केलेली जकात बाद करावी.

११. सन १८७८ चा आक्ट ८ वा, कलम २३, ह्याची सुधारणा.

**परिशिष्ट १.—रद्द केलेले आक्ट.**

**परिशिष्टें २, ३ व ४.—देशांत येणाऱ्या मालाचें तारीफ.**

**परिशिष्ट ५.—देशाबाहेर जाणाऱ्या मालाचें तारीफ.**

**कस्टमचे जकातीसंबंधीं कायदा सुधारण्याकरितां व इतर कारणांकरितां आक्ट.**

समुद्रावरून देशांत येणाऱ्या व देशाबाहेर जाणाऱ्या मालावरील कस्टमच्या जकातीसंबंधीं कायदा सुधारणें, व हिंदुस्थानांतील कित्येक परकी युरोपीयन संस्थानांच्या व कित्येक देशी संस्थानिकांच्या सरहद्दींतून येणाऱ्या जाणाऱ्या मालावर जकात घेण्याविषयीं तजवीज करणें ज्याअर्थी योग्य आहे त्याअर्थी खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

१. (१) या आक्टास "सन १८९४ चा हिंदुस्थानाचा तारिफासंबंधीं आक्ट" असें ह्मणावें.

(२) एडन व पेरिम शिवायकरून तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

रद्द करण्याबाबद.

२. (१) पहिल्या परिशिष्टांत सांगितलेले आक्ट त्या परिशिष्टांत सांगितलें आहे तेथवर रद्द केले आहेत असें समजावें.

(२) परंतु त्यांपैकीं कोणत्याही आक्टाअन्वयें प्रसिद्ध केलेले जे जाहिरनामे व केलेले जे कानू व हुकूम या आक्टाच्या सुरुवातीच्या लगत आधीं अमलांत असतील ते, या आक्टास अनुसरून असतील तेवढ्या पुरते, या आक्टाअन्वयें प्रसिद्ध केलेले व केलेले आहेत असें समजलें पाहिजे.

(३) हा आक्ट अमलांत येण्यापूर्वी ठरविण्यांत आलेल्या आक्टांमध्यें अगर कायद्यांमध्यें सन १८७९ चा हिंदुस्थानचा तारिफाचा आक्ट आणि सन १८८२ चा हिंदुस्थानचा तारिफाचा आक्ट ह्यांसंबंधी केलेले सर्व उल्लेख ह्या आक्टास अनुलक्षून केलेले आहेत असें समजावें.

(४) मीठ, अफीण व गाळलेली दारू हीं खेरीजकरून इतर कोणताही पदार्थ ब्रिटिश हिंदुस्थानांतलि एका कस्टमच्या बंदराहून दुसऱ्या कस्टमच्या बंदरास नेला असतां त्यावर कस्टमची जकात घेण्याचा अधिकार या आक्टांतील कोणत्याही ठरावावरून प्राप्त होतो असें समजूं नये.

परिशिष्टांत सांगितलेल्या जकाती वसूल करावयाच्या.

३. ज्या ज्या बंदरास हा आक्ट लागू आहे त्या त्या बंदरांत, या आक्टास जोडलेल्या दुसऱ्या, तिसऱ्या, चवथ्या व पांचव्या परिशिष्टांत सांगितलेल्या जकाती बसवून वसूल केल्या पाहिजेत.

कोचिनांतून मिरीं बाहेर पाठविण्याबाबद.

४. कोचिनच्या बंदरांतून समुद्रमार्गानें पाठविलेल्या सर्व मिऱ्यांवर, दर खंडीस पराकाष्ठा नऊ रुपयेपर्यंत जितकी जकात मद्रासचे गव्हर्नर इन् कौन्सिल हे वेळोवेळीं ठरवितील तितकी जकात घेतली पाहिजे; आणि दरसाल अखेरीस, अगर त्यानंतर सोईस पडेल तितकें लवकर, सदई बंदरांतील कस्टमच्या कलेक्टरानें, या क-

लमाअन्वयें वसूल केलेल्या जकातींतून ती वसूल करण्याचा खर्च बाद करून, बाकीचा ऐवज मद्रासचे गव्हर्नर इन् कौन्सिल वेळोवेळीं फर्मावितील त्या प्रमाणानें व रीतीनें त्रावणकोरच्या व कोचिनच्या सरकारांस दिला पाहिजे.

विवक्षित सरहद्दींवरून येणाऱ्या जाणाऱ्या मालावर जकात.

५. (१) खालीं लिहिलेल्या ठिकाणांहून खुष्कीच्या मार्गानें त्या ठिकाणांबाहेर जाणाऱ्या मालावर या आक्टास जोडलेल्या दुसऱ्या, तिसऱ्या, व चवथ्या परिशिष्टांत आणि सदरहू ठिकाणीं जाणाऱ्या मालावर या आक्टास जोडलेल्या पांचव्या परिशिष्टांत ठरविलेल्या दरांप्रमाणें कस्टमच्या जकाती घेतल्या पाहिजेत; तीं ठिकाणें येणेंप्रमाणें:—

(अ) हिंदुस्थानांतलीं परकी युरोपीयन संस्थानें;

(ब) ह्या कलमांत पुढें दिलेल्या अधिकारावरून परकी मुलुक ह्मणून ठरविलेला कोणताही मुलुक.

(२) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या निर्बंधास पात्र राहून, मद्रासचे गव्हर्नर इन् कौन्सिल व मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांना, आपापल्या स्थानिक सरकारी गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, त्या त्या गव्हर्नरांच्या वहिवाटीखालील मुलुकांमध्यें अगर त्या मुलुकांच्या सरहद्दीवर असलेल्या परंतु त्या मुलुकांतील कोर्टांच्या व दिवाणी अधिकाऱ्यांच्या हुकुमतीखालीं नसणाऱ्या कोणत्याही देशी संस्थानिकाचा मुलुक, या कलमाच्या कारणांकरितां परकी मुलुक समजला पाहिजे असा ठराव करण्याचा अखत्यार आहे.

(३) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांना, इंडिया गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, इतर कोणत्याही देशी संस्थानिकाचा मुलुक या कलमाच्या कारणांकरतां परकी मुलुक समजावा, असें ठरविण्याचा अखत्यार आहे.

सन १८६३ चा आक्ट १६ वा, कलम १, याची सुधारणा.

६. सन १८६३ चा आक्ट १६ वा, कलम १, ह्यांत, "१० टकेप्रमाणें जकात होईल ती" ह्या शब्दांच्या ऐवजीं, "५ टक्यांपेक्षां जास्त नाहीं अशा दरानें जकात" हे शब्द दाखल करावे.

सर्टिफिकेटाचा आधार असलेल्या गाळलेल्या दारूवर, अफिणीवर व मिठावर जकात.

७. (१) ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदराहून आणलेली गाळलेली दारू, अफीण व मीठ हीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं अगर स्थानिक सरकारानें सर्टिफिकेट देण्यास अधिकार दिलेल्या कोणत्याही अमलदाराच्या सर्टिफिकेटाच्या आधारावर आणलीं तर, या आक्टास जोडलेल्या तिसऱ्या परिशिष्टाआधारें त्यांवर घ्यावयाची जकात सदरहू सर्टिफिकेटांत त्यांवर आगोदरच दिली ह्मणून लिहिलेल्या जकातीपेक्षां कांहीं जास्त ठरत असल्यास तेवढी जास्त रकम मात्र त्यांबद्दल घेतली पाहिजे.

(२) अशा अफिणीची अगर मिठाची किंमत ह्मणून सरकारास एकादी रकम भरलेली असल्यास ती या कलमाच्या अर्थान्वयें जकात होत नाहीं.

(३) सन १८७८ चा जलमार्गाच्या कस्टमबाबत आक्ट ह्याच्या १४ व्या बाबींतल्या ठरावांअन्वयें जी गाळलेली दारू एक्साइजच्या ड्यूटीबाबत खत लिहून देऊन एका कस्टमच्या बंदरापासून दुसऱ्या कस्टमच्या बंदरास पाठविण्यांत येईल तिला ह्या कलमांतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं.

जकातींबाबदचे व मालाबाबदचे किरकोळ ठराव लागू करणें.

८. मद्रास इलाक्याच्या संबंधानें सन १८४४ चा आक्ट नंबर ६ याचे, व मुंबई इलाक्याच्या संबंधानें सन १८५७ चा आक्ट नंबर २९ याचे जकाती घेण्याबाबदचे व जकात घेण्यालायक मालाबाबदचे रद्द न झालेले ठराव, जरूरीच्या फेरफारांनिशीं, कलम ५, पोटकलम (१), (ब) रकमेअन्वयें अगर तिच्या आधारावर घेतलेल्या जकातींना व जकात घेण्यालायक मालाला लागू होतील.

जाहिरनामे रद्द करण्याचा अधिकार.

९. या आक्टाअन्वयें प्रसिद्ध केलेले दरोबस्त जाहिरनामे, ज्या अधिकाऱ्याकडून ते प्रसिद्ध केले जातील त्या अधिकाऱ्यांस रद्द करण्याचा अख्त्यार आहे.

करार केल्यानंतर जकात जास्त करण्यांत आल्यास जास्त केलेली जकात मिळावी, अगर ती कमी करण्यांत आल्यास कमी केलेली जकात बाद करावी.

१०. कोणतीही वस्तु विकण्याचा करार करितांना त्या वस्तूवर कोणतीही जकात पडत नसल्यामुळें जकात देण्याची कोणतीही शर्त घातल्याशिवाय ती वस्तु विकण्याचा करार केल्यानंतर अथवा तसा करार करतांना त्या वस्तूवर जकात पडत असल्यामुळें ती जकात धरून ती वस्तु विकण्याचा करार केल्यानंतर त्या वस्तूवर कस्टमची अगर एकसाइजची कोणतीही जकात बसविण्यांत येईल, जास्त करण्यांत येईल किंवा कमी करण्यांत येईल किंवा माफ करण्यांत येईल त्याप्रसंगीं--

(अ) अशा बसविलेल्या अगर जास्त करण्यांत आलेल्या जकातीचा जर अशा रीतीनें अमल होईल कीं, ती बसविलेली जकात अगर जास्त केलेली जकात--जी असेल ती--भरण्यांत येते, तर, विकणाऱ्यास, त्या जकातीइतकी अगर जास्त केलेल्या जकातीइतकी रकम करारांत लिहिलेल्या किंमतींत मिळविण्याचा अखत्यार आहे; आणि अशी जास्त झालेली रकम मिळण्याचा आणि तिच्याबद्दल दावा करून ती वसूल करण्याचा त्या विकणाऱ्यास हक्क आहे असें समजावें, आणि

(ब) अशा कमी केलेल्या जकातीचा अगर माफीचा जर अशा रीतीनें अमल होईल कीं, कमी केलेली जकात मात्र देण्यांत येते किंवा जकात मुळींच देण्यांत येत नाहीं,--जसें असेल तसें--तर, खरेदी करणारास, कमी केलेल्या अगर माफ केलेल्या जकातीइतकी रकम करारांतील रकमेंतून बाद करण्याचा अख्त्यार आहे; आणि ह्याप्रमाणें बाद केलेली रकम देण्यास अगर तिच्या संबंधानें अगर बद्दल दावा केला जाण्यास तो पात्र होणार नाहीं.

सन १८७८ चा आक्ट ८ वा, कलम २३, याची सुधारणा.

११. सन १८७८ चा जलमार्गाचे कस्टम्सचा आक्ट, ह्याच्या २३ व्या कलमाच्या दुसऱ्या पारिग्राफांत, "हकीकतीवरून" ह्या शब्दानंतर, "गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांची आधीं मंजुरी घेऊन" हे शब्द दाखल करावे.

---

## परिशिष्ट १ लें.—(रद्द केलेले आक्ट.)

| नंबर व वर्ष. | सरनामा. | किती रद्द केला तें. |
|---|---|---|
| | **गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांचे आक्ट.** | |
| १८८२ चा ११ ... ... | १८८२ चा हिंदुस्थानचा तारिफासंबंधी आक्ट ... | रद्द केलेला नाहीं तितका सगळा. |
| १८८७ चा २ | सन १८७८ चा जलमार्गाचे कस्टम्सचा आक्ट, सन १८८१ चा एक्साइज आक्ट, आणि सन १८८२ चा हिंदुस्थानचा तारिफासंबंधी आक्ट हे सुधारण्याकरितां आक्ट. | कलम ८. |
| १८८८ चा २ | पिट्रोलियमवर कस्टमची जकात घेण्याबाबद आक्ट. | कलम १. |

## परिशिष्ट १ लें.—( पुढें चालू ).

| नंबर व वर्ष. | सरनामा. | किती रद्द केला तें. |
|---|---|---|
| १८८९ चा ८ | सन १८७८ चा जलमार्गाचे कस्टम्सचा आक्ट आणि सन १८८२ चा हिंदुस्थानचा तारिफासंबंधी आक्ट, हे सुधारण्याविषयीं आक्ट. | कलमें ३, ४, व ९. |
| १८९० चा १२ | सन १८८२ चा हिंदुस्थानचा तारिफासंबंधी आक्ट सुधारण्याबाबद आक्ट. | सगळा. |
| १८९२ चा १ ... | ... सन १८८२ चा हिंदुस्थानचा तारिफासंबंधी आक्ट सुधारण्याबाबद आक्ट. | ,, |
| १८९३ चा ९ ... | ... सन १८८२ नंतरच्या आक्टांअन्वयें सुधारलेला सन १८८२ चा हिंदुस्थानचा तारिफासंबंधी आक्ट सुधारण्याबाबद आक्ट. | ,, |

## परिशिष्ट २ रें.—( देशांत येणाऱ्या मालाचें तारीफ. )

**हत्यारें, युद्धसामग्री व लष्करी स्टोर**—ह्यांत, ह्या परिशिष्टांत विशिष्ट रीतीनें सांगितलेल्या पदार्थांशिवाय, खालीं लिहिलेल्या पदार्थांचाही समावेश होतो. ते पदार्थ येणेंप्रमाणें :—

(अ) हिंदुस्थानचा हत्यारांबाबद आक्ट ह्याच्या अर्थाअन्वयें "हत्यारें" किंवा "युद्धसामग्री" असणारे सर्व पदार्थ आणि

(ब) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे, ह्या आक्टाच्या कारणांसाठीं, इंडिया गॅझेटमध्यें जाहिरनामा देऊन ज्या कोणत्याही पदार्थांस "लष्करी स्टोर" ह्मणून ठरवितील ते सर्व पदार्थ.

| पदार्थांचीं नांवें. | जकात. रु. | आ. |
|---|---|---|
| १. तमंचा खेरीज इतर अग्निशस्त्रें, प्रत्येकाबद्दल. ... ... ... | ५० | ० |
| २. त्यांकरतां नळ्या, त्या मग एकेरी असोत अगर जोडनळ्या असोत, प्रत्येकीबद्दल. | ३० | ० |
| ३. तमंचे, प्रत्येकाबद्दल ... .... ... ... ... | १५ | ० |
| ४. त्यांकरतां नळ्या, त्या मग एकेरी असोत अगर जोडनळ्या असोत, प्रत्येकीबद्दल. | १० | ० |
| ५. अग्निशस्त्रांकरतां उपयोग करावयाच्या कमानी, प्रत्येकीबद्दल ... ... | ८ | ० |
| ६. बंदुकीचे दस्ते, सैट्स (माग्रा), ब्लॉक व रोलर, प्रत्येकाबद्दल ... ... | ५ | ० |
| ७. रिव्हाल्व्हर ब्रीची, जितकीं काडतुसें त्यांत राहतील त्या दरएक काडतुसाबद्दल. | २ | ८ |
| ८. एक्ट्राक्टर, निप्पर, हीलप्लेट, पिन्, स्क्रू, व्यांग, बोल्ट, थम्बपीस, ट्रिगर, ट्रिगरगार्ड, ह्यामर, पिस्टन, प्लेट, व अग्निशस्त्रांच्या ज्या इतर भागांकरतां यांत एरवीं ठराव केला नसेल ते भाग, आणि तीं साफ करण्यासाठीं किंवा जोडण्यासाठीं किंवा भरण्यासाठीं उपयोग करावयाचीं सर्व हत्यारें, प्रत्येकाबद्दल. ... ... ... ... | १ | ८ |

| | | जकात. | |
|---|---|---|---|
| | | रु. | आ. |
| ९. | काडतुसें करण्याचीं, भरण्याचीं किंवा बंद करण्याचीं यंत्रें, प्रत्येकाबद्दल ... | १० | ० |
| १०. | काडतुसांला तोट्या बसवायाचीं यंत्रें, प्रत्येकाबद्दल ... ... ... | २ | ८ |

**अपवाद १ ला.**—वरील तपशिलाच्या ५ व्या, ६ व्या, ८ व्या, ९ व्या, अगर १० व्या सदरांत येणारे पदार्थ, १ ले किंवा ३ रें सदरांत मोडणारे अग्निशस्त्रासंबंधाचे असून अशा अग्निशस्त्राबरोबर एकाच पेटींत बसविले असतील तेव्हां, त्यांवर जकात पडणार नाहीं.

**अपवाद २ रा.**—खालील जिन्नसांवरही जकात पडणार नाहीं:—

(अ) डिप्लोमाटिक, लष्करी अगर पोलीस युनिफॉर्म वापरण्याचा हक्क असणाऱ्या अमलदाराच्या नेहमीच्या सरंजामाचीं अङ्गभूत हत्यारें;

(ब) मलिका मआज्ञमांच्या रेग्युलर फौजेच्या कोणत्याही अमलदारानें अगर एकाद्या व्हालंटियर कोरच्या कमिशन्ड अमलदारानें आपल्या बरोबर घेतलेली तरवार, रिव्हाल्व्हर अगर तमंचाची जोडी, किंवा असा अमलदार ज्या कोरचा असेल त्या कोरच्या कमांडंटाकडून अगर कोणत्याही कोरामध्यें नसलेल्या अमलदाराच्या बाबतींत तो अमलदार ज्या ठाण्यांत अगर डिस्ट्रिक्टांत नोकरी करीत असेल त्या ठाण्यावर अगर डिस्ट्रिक्टावर हुकुम चालत असलेल्या रअमलदााकडून जी तरवार, रिव्हाल्व्हर अगर तमंचाची जोडी त्या अमलदारानें आपल्या सरंजामाच्या कारणांसाठीं बाहेरून आणिलेली असल्याबद्दल दाखला मिळालेला असेल, ती तरवार, रिव्हाल्व्हर अगर तमंचाची जोडी;

(क) इन्स्पेक्टर जनरल आफ पोलीस यांजकडून ज्या तरवारी आणि रिव्हाल्व्हर अपल्या पोलीस फौजेंतल्या लोकांच्या साधारण सरंजामापैकीं असल्याबद्दल दाखला मिळालेला असेल, त्या तरवारी व रिव्हाल्व्हर;

(ड) मलिका मआज्ञमांच्या फौजेमधल्या देशी कमिशन्ड अमलदारांच्या सरंजामापैकीं तरवारी;

(इ) लष्करास अगर व्हालंटियरांस इनाम ह्मणून द्यावयाच्या तरवारी;

(फ) हिंदुस्थानांतील कोणत्याही देशी संस्थानाच्या लष्कराचा जो भाग बादशाही सरकाराच्या तैनातीसाठीं उभारून तयार ठेविलेला असेल, त्या भागाच्या उपयोगासाठीं हिंदुस्थान सरकारच्या मंजुरीनें आणिलेलीं हत्यारें, युद्ध सामुग्री आणि लष्करी स्टोर;

(ग) ब्रिटिश व देशी पलटणींच्या अगर व्हालंटियर कोरांच्या कमांडिंग आफिसरांनीं आपल्या लोकांस शिकविण्यासाठीं आणिलेल्या मारिसव्यूब व पेटंट युद्धसामुग्री.

**विशेष ठराव १ ला.**—वरील तपशिलांत सांगितल्यापैकीं कोणतेही पदार्थ जवळ असण्याचा कायदेशीर रीतीनें हक्क असणाऱ्या कोणी मनुष्यानें ते आपल्या खासगी उपयोगाकरतां वाजवी प्रमाणानें बाहेरून आणले असतां त्यांवर किंमतीच्या आकारावरून दहा टक्यांहून जास्त जकात घेतां कामा नये.

**विशेष ठराव २ रा.**—जे पदार्थ इतर रीतीनें बाहेरून आणले असून ज्यांवर १ ते १० ह्या नंबरांआधारें जकात घेतली असेल अगर घ्यावयाची असेल, ते पदार्थ त्या आणणाराकडून वर सांगितल्याप्रमाणें कायदेशीर रीतीनें हक्क असणाऱ्या मनुष्यानें आपल्या खासगी उपयोगाकरितां वाजवी प्रमाणानें फुटकळ विकत घेतले, तर, त्या आणणाराला, किंमतीच्या आकारावरून शेंकडा दहा टक्यांहून जास्त असेल तेवढी त्यांवरील जकात परत मिळण्याविषयीं अगर सोडण्याविषयीं ( असेल त्याप्रमाणें ) कस्टम-कलेक्टराकडे अर्ज करण्याचा अखत्यार आहे; आणि सदहू पदार्थ तेच आहेत, व अशा आणणाऱ्याला जकात सदहूप्रमाणें परत अगर माफ होण्याचा इतर कारणासाठींही हक्क आहे अशी सदहू कलेक्टराची खात्री होईल, तर त्यानें ती परत दिली अगर माफ केली पाहिजे.

| | | तारिफाप्रमाणें किंमत. | रु० | आ० | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| ११. | बंदुकीची दारू, साधी .... ... ... | दर रतलास. | ० | ९ | शेंकडा १० टक्के. |
| | ,, ,, शिकारीची ... ... ... | दर रतलास. | १ | ० | शेंकडा १० टक्के. |
| १२. | इतर सर्व प्रकारचीं हत्यारें, युद्धसामुग्री आणि लष्करी स्टोर. | किंमतीवर. | | | शेंकडा १० टक्के. |

## परिशिष्ट ३ रें.—(देशांत येणाऱ्या मालाचें तारिफ).

### दारू, अफीण, मीठ आणि खारवलेली मासळी.

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|
| १ | दारू— | | |
| | एल, बीर व पोर्टर. ... .... ... ... | इंपीरियल ग्यालनास किंवा सहा कार्ट बाटल्यांस. | एक आणा. ... ... |
| | सैडर व धान्य वगैरे कुजवून त्यापासून तयार केलेल्या इतर दारू. ... ... ... ... | इंपीरियल ग्यालनास किंवा सहा कार्ट बाटल्यांस. | एक आणा. ... ... |
| | लिकूर ( शर्करामिश्रित दारू ) ... ... ... | ,, | ६ रुपये ... ... ... |
| | कलाकौशल्यें किंवा कारखाने किंवा रासायनिक क्रियांतच मात्र उपयोग करावयाची गाळलेली दारू मनुष्यानें पिण्याला अगदीं व कायमची नालायक केली असेल ती ... ... ... ... | ...... | किंमतीप्रमाणें शेंकडा ५ टक्के. |
| | औषधी द्रव्यांत, औषधांत अगर रसायनांत शेंकडा २० या प्रमाणाहून कमी प्रमाणानें उपयोग केलेली लंडन प्रुफ कसाची गाळलेली दारू... ... ... | ...... | किंमतीप्रमाणें शेंकडा ५ टक्के. |

## परिशिष्ट ३ रें.—(पुढें चालू).

### दारू, अफीण, मीठ आणि खारवलेली मासळी—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|
| | **दारू**—(पुढें चालू.) | | |
| | शेंकडा वीस अगर त्याहून जास्त या प्रमाणानें सदर्हूप्रमाणें उपयोग केलेली गाळलेली दारू. | **लंडन** प्रुफ कसाचे इंपीरियल ग्यालनास किंवा सहा कार्ट बाटल्यांस. | ६ रुपये, आणि सदर्हू दारूचा कस लंडन प्रुफाहून जितका जास्त असेल किंवा कमी असेल तितक्या प्रमाणानें जकात वाढवावयाची किंवा कमी करावयाची. |
| | गाळलेली दारू, सुवासिक, पिंपांमध्यें अगर बाटल्यांमध्यें भरलेली. | इंपीरियल ग्यालनास किंवा सहा कार्ट बाटल्यांस. | ८ रुपये. |
| | गाळलेली दारू, इतर प्रकारची ... ... | **लंडन** प्रुफ कसाचे इंपीरियल ग्यालनास किंवा सहा कार्ट बाटल्यांस. | ६ रुपये, आणि सदर्हू दारूचा कस लंडन प्रुफाहून जितका जास्त असेल किंवा कमी असेल तितक्या प्रमाणानें जकात वाढवावयाची किंवा कमी करावयाची. |
| | **वैन**— | | |
| | जींत प्रूफ गाळलेली दारू ४२ टक्यांपेक्षां जास्त नाहीं अशी शांपेन व इतर सर्व चकाकणारी वैन. | इंपीरियल ग्यालनास किंवा सहा कार्ट बाटल्यांस. | २ रुपये ८ आणे. |
| | जींत प्रूफ गाळलेली दारू ४२ टक्यांपेक्षां जास्त नाहीं अशी शांपेन व इतर सर्व चकाकणारी वैन. | ” | ६ रुपये. |
| | जींत प्रूफ गाळलेली दारू ४२ टक्यांपेक्षां जास्त नाहीं अशी इतर सर्व प्रकारची वैन. | ” | १ रुपया. |
| | जींत प्रूफ गाळलेली दारू ४२ टक्यांपेक्षां जास्त नाहीं अशी इतर सर्व प्रकारची वैन. | ” | ६ रुपये. |
| २ | **अफीण** सरकारी पास नसलेली. ... ... | ८० तोळ्यांच्या शेरास. | २४ रुपये. |
| ३ | **मीठ** ... ... ... ... ... | ८२$\frac{2}{7}$ अव्हार्डुपाइज पौंड वजनाच्या बंगाली मणास. | ज्याठिकाणीं मीठ आणावयाचें असेल त्या ठिकाणीं तयार केलेल्या मिठावर त्या त्या वेळीं ध्यावयाच्या एक्साइजच्या जकातीचा दर. |
| ४ | **खारवलेली मासळी**, ओली अगर सुकी... ... | ” | **गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे इंडियागझेटांत जाहीरनामा देऊन बारा आण्यांपेक्षां जास्त नाहीं असा किंवा असे जे दर ठरवितील तो किंवा ते दर.** |

## परिशिष्ट ४ थें—(देशांत येणाऱ्या मालाचें तारिफ).

### सामान्य जकात.

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | | | रु. | आ. | |
| | **खाण्याचे व पिण्याचे पदार्थ.** | | | | |
| १ | काफी ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ६९ | ० | दर शेंकडा टक्के. |
| २ | **फळें व भाजीपाला--** | | | | |
| | वदामाचे गोळे ... ... ... ... | ,, | ४० | ० | ,, |
| | बदाम सालांसहीत ... ... ... | ,, | १३ | ० | ,, |
| | काजूगोळे ... ... ... ... | ,, | १२ | ० | ,, |
| | नारळ ... ... ... ... ... | हजारास. | ४० | ० | ,, |
| | खोबरें ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ९ | ० | ,, |
| | मनुका, युरोपियन ... ... ... | ,, | ३९ | ० | ,, |
| | ,, इराणी ... ... ... | ,, | १२ | ० | ,, |
| | खारका, कप्यांतील ... ... .. | ,, | ९ | ० | ,, |
| | खजूर, कप्यांतील ... ... ... ... | ,, | ४ | ० | ,, |
| | ,, वरण्यांतील व पेट्यांतील ... ... | ,, | ८ | ० | ,, |
| | अंजीर युरोपियन ... ... ... ... | ,, | ४२ | ० | ,, |
| | ,, इराणी सुके ... ... ... | ,, | ६ | ८ | ,, |
| | लसूण ... ... ... ... ... | ,, | ९ | ० | ,, |
| | पिस्ते ... ... ... ... ... | ,, | २९ | ० | ,, |
| | प्रून बसराई (अलुबुखार) ... ... ... | ,, | १० | ० | ,, |
| | द्राक्षें काळीं, इराणच्या अखाताचीं व तांबड्या समुद्राचीं व खिसमीस ... .. ... ... | ,, | १२ | ० | ,, |
| | ,, मनुका इराणच्या अखाताच्या व तांबड्या समुद्राच्या. | ,, | १० | ० | ,, |
| | ,, मलागा व ब्लूम ... ... ... | रतलास. | ० | १० | ,, |
| | ,, इतर प्रकारचीं ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | अक्रोड ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ६ | ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारचीं, ताजीं फळें व भाजीपाला जो वेगळा लिहिला नाहीं व ज्याची जकात माफ आहे तो खेरीज करून ... ... ... | | किमतीवर. | | ,, |
| ३ | **खाण्याचे पदार्थ, आईलम्यान्स स्टोर ( तेल, मध, विनागरी व दारू यांचे तयार केलेले खाण्याचे पदार्थ विलायतेहून येतात ते ), आणि किराणा जिन्नस.** | | | | |
| | खारवलेलें डुकराचें मांस डब्यांतील, जौल व गालफडें. | रतलास. | ० | १२ | ,, |

## परिशिष्ट ४ थें—(पुढें चालू).

### सामान्य जकात—( पुढें चालू ).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | | | रु. | आ. | |
| | खाण्याचे व पिण्याचे पदार्थ,—(पुढें चालू). | | | | |
| | गोमांस व डुकराचें मास— | तीन हंड्रेडवेटा-चे टियर्सीस. | ७९ | ० | दर शेंकडा ५ टक्के. |
| | | दोन हंड्रेडवेटा-चे पिंपास ... | ५० | ० | ,, |
| | समुद्रांतील जळवा ... ... ... | हंड्रेडवेटास. | ५० | ० | ,, |
| | लोणी ... ... ... ... ... | रतलास. | १ | ० | ,, |
| | पनीर ... ... ... ... ... | ,, | ० | १२ | ,, |
| | चिनाई मुरंबे ... ... .. ... | सहा वर्ण्यांचे पेटीस. | ८ | ० | ,, |
| | मासळीचे भोत ... .. ... ... | हंड्रेडवेटास. | १०० | ० | ,, |
| | पीठ ... ... ... ... ... | २०० रतलांचे पिंपास किंवा थैल्यास. | २० | ० | ,, |
| | तूप ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ४० | ० | ,, |
| | किराणा जिन्नस, ज्याचा इतर रीतीनें तपशील लिहिला-नाहीं तो ... ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | डुकराच्या तंगड्या ... ... | रतलास. | ० | १२ | ,, |
| | सागूदाणा ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | १० | ० | ,, |
| | शार्क माशाचे पंख ... ... ... | ,, | ३० | ० | ,, |
| | सिंगाली व सोझेली ... ... ... | ,, | १९ | ० | ,, |
| | तापीओका .... ... ... ... | ,, | १२ | ० | ,, |
| | विनागरी युरोपियन, पिंपांतील . . ... | इंपीरियल ग्या-लनास. | १ | ० | ,, |
| | ,, इराणी ... ... ... | ,, | १ | | ,, |
| | ,, गांवठी ... ... ... | ,, | ० | ६ | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे खाण्याचे पदार्थ, आइम्यान्सस्टोर्स व किराणा जिन्नस ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| ४ | मसाल्याचे पदार्थ— | | | | |
| | बादियान. ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | २९ | ० | ,, |
| | सुपाऱ्या गोवेगिरी... ... ... ... | ,, | १४ | ० | ,, |
| | पोफळें .. ... ... ... ... | हजारास. | २ | ० | ,, |
| | सुपारी पांढरी श्रीवर्धनी ... ... ... | हंड्रेडवेटास. | २८ | ० | |
| | इतर सर्व प्रकारच्या सुपाऱ्या... ... ... | ,, | ७ | ० | ,, |
| | वेलची, खोटी नाहीं अशी ... ... ... | ,, | २५० | ० | ,, |

## परिशिष्ट ४ थें—(पुढें चालू).

### सामान्य जकात—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | | | रु. | आ. | |
| | **खाण्याचे व पिण्याचे पदार्थ—( पुढें चालू ).** | | | | |
| | मिरच्या सुक्या ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ९ | ० | दर शेंकडा ५टक्के. |
| | लवंगा ... ... ... ... ... | " | २० | ० | " |
| | " देंट आणि फुलें ... ... ... | " | ५ | ० | " |
| | " मोहर, नरलवंग ... ... .. | " | ८ | ० | " |
| | सुंठ सुकी ... ... ... ... | " | २० | ० | " |
| | जायपत्री ... ... ... ... | रतलास. | १ | ८ | " |
| | जायफळें ... ... ... ... | " | १ | ० | " |
| | जायफळें सालासुद्धां ... ... ... | रतलास. | ० | १० | " |
| | मिरीं, काळें व पिंपळ्या ... ... ... | हंड्रेडवेटास. | १६ | ० | " |
| | " पांढरें ... ... ... ... | " | ३५ | ० | " |
| | इतर सर्व प्रकारचे मसाल्यांचे पदार्थ ... ... | ... | किमतीवर. | | " |
| ५ | खडीसाखर चिनाई ... ... .... | हंड्रेड्वेटास. | २० | ० | " |
| | शूगर लोफ ... ... ... ... | " | २३ | ० | " |
| | कणीदार साखर ... ... ... ... | " | १४ | ० | " |
| | इतर सर्व प्रकारची साखर, शर्करांशी सर्व पदार्थ, आणि मिठाई धरून ... ... ... | ... | किमतीवर. | | " |
| ६ | चाहा काळा ... ... ... ... | रतलास. | ० | १० | " |
| | " हिरवा ... ... ... ... | " | १ | ४ | " |
| | **रसायनें, औषधी, औषधें व कैफ आणणारे पदार्थ आणि रंग देण्याचे व कातडीं कमावण्याचे पदार्थ.** | | | | |
| ७ | **रसायनक्रियेनें झालेले व तयार केलेले पदार्थ—** | | | | |
| | आसिड् सल्फ्यूरिक ( गंधकाचें तेजाब ) ... | रतलास. | ० | २ | " |
| | अल्कली गांवठी, (सज्जीखार) ... ... | हंड्रेडवेटास. | २ | ० | " |
| | फटकी... ... ... ... ... | " | ५ | ० | " |
| | सोमल... ... .. ... ... | " | २५ | ० | " |
| | " चिनाई मनशील ... ... ... | " | १६ | ० | " |
| | बायकार्बोनेट आफ् सोडा ... ... ... | " | ७ | ० | " |
| | हिराकस ... ... ... ... | " | ३ | ० | " |
| | बारी पदार्थ, म्हणजे, सुरुंगाचें जिलटैन, डैनमैट रॉव्युराइट, टोनाइट, व इतर सर्व प्रकारचे ... | ... | किंमतीवर. | | " |
| | नवसागर ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ३० | ० | " |

## परिशिष्ट ४ थें—(पुढें चालू).

### सामान्य जकात—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | | | रु. | आ. | |
| | **रसायनें, औषधी, औषधें, आणि कैफ आणणारे पदार्थ इत्यादि—(पुढें चालू.)** | | | | |
| | गंधक, भुकी .... ... ... .. | हंड्रेडवटास. | ५ | ८ | दर शेंकडा ५ टक्के. |
| | ,, कांड्याचा ... ... ... | ,, | ५ | ० | ,, |
| | ,, कच्चा .. ... ... | ,, | ४ | ० | |
| | इतर सर्व प्रकारचे रसायनक्रियेनें झालेले व तयार केलेले पदार्थ .... ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| ८ | **औषधी, औषधें, आणि कैफ आणणारे पदार्थ—** | | | | |
| | येळिया, काळा ... .... ... ... | हंड्रेडवेटास. | १४ | ० | ,, |
| | ,, सोकोत्र्याचा ... ... ... | ,, | २५ | ० | ,, |
| | अगरू ... ... ... ... ... | रतलास. | ३ | ० | ,, |
| | हिंग ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ८० | ० | |
| | हिंग, जाडा ( हिंगडा ) ... ... | ,, | १८ | ० | ,, |
| | अत्तरें इराणी ... ... ... ... | ,, | १५ | ० | ,, |
| | अमलसारा (गंधक) ... ... ... | ,, | ४५ | ० | ,, |
| | कापूर, भीमसेनी (बरास) ... ... ... | रतलास. | १०० | ० | ,, |
| | ,, साफ केलेला, वड्यांचा ... ... | ,, | १ | ० | ,, |
| | ,, कच्चा, भुकी ... ... .. | ,, | ० | १२ | |
| | दालचिनी ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | २० | ० | ,, |
| | चोबचिनी सालीसकट ... ... ... | ,, | ७ | ० | ,, |
| | ,, साल काढलेली ... ... ... | ,, | १६ | ० | |
| | कोळंजन चिनाई ... ... ... ... | ,, | ८ | ० | |
| | अक्कलकाडा .... .... ... ... | ,, | ३० | ० | ,, |
| | सालममिश्री ... ... ... ... | ,, | १०० | ० | ,, |
| | सोनामुखीचीं पानें... ... ... ... | ,, | ४ | ८ | ,, |
| | शिळारस ... ... ... ... | ,, | ४६ | ० | ,, |
| | तंबाखू, तयार केलेली व कच्ची... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | इतर सर्व प्रकारच्या औषधी, औषधें व कैफ आणणारे पदार्थ, क्विनीनवर जकात माफ आहे तें व अफीण (हिच्याबद्दल परिशिष्ट ३ पाहा ) खेरीजकरून ... | ... | ,, | | ,, |
| ९ | **रंग देण्याचे व कातडीं कमावण्याचे पदार्थ—** | | | | |
| | अलिझरीन रंग—सर्व रंगांचे... ... ... .. | | ,, | | ,, |
| | अनिलैन .... .... .... ... ... | रतलास. | १ | ८ | ,, |
| | किर्मीज ... ... ... ... ... | ,, | १ | ० | ,, |

## परिशिष्ट ४ थें—( पुढें चालू).

### सामान्य जकात—( पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | | | रु. | आ. | |
| | **रसायनें, औषधी, औषधें आणि कैफ आणणारे पदार्थ, इत्यादि, (पुढें चालू).** | | | | |
| | हरडे. ... ... .... ... ... | हंड्रेडवेटास. | ४ | ८ | दर शेंकडा ५ टक्के. |
| | माजूफळ, इराणी ... ... ... ... | ,, | ३७ | ० | ,, |
| | मंजिठ ... ... ... ... | ,, | १२ | ० | ,, |
| | आर्चिलावीड ( एकाजातीचें गवत रंगाकारितां मोसंबीकडून येत असतें तें ) ... ... ... | ,, | ९ | ८ | ,, |
| | पतंगाचें लांकूड व मूळ ... ... ... | ,, | ५ | ८ | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे रंग देण्याचे व कातडीं कमावण्याचे पदार्थ... ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | **धातू व धातूच्या केलेल्या जिनसा.** | | | | |
| १० | **लोखंडी सामान व कटलरी** (चाकू कातऱ्या वगैरे) लोखंडाचें तयार केलेलें सामान व मुलामा दिलेलें सामान यांसुद्धां, परंतु यंत्रें व यंत्रांचे भाग ज्यांची जकात माफ आहे तीं खेरीज करून ... | ... | किमतीवर. | | ,, |
| ११ | **धातू**, घांट न घडलेल्या व घांट घडलेल्या व धातूच्या केलेल्या जिनसा— | | | | |
| | पितळेचे मणी, घागऱ्या, चिनाई ... ... | हजारास. | १ | ० | ,, |
| | जुनी पितळ ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | २७ | ० | ,, |
| | पितळेचे पत्रे, वळविलेले, फार पातळ ... ... | ,, | ७५ | ० | ,, |
| | पितळेची तार .. ... ... ... | रतलास. | ० | ७ | ,, |
| | इतर सर्व प्रकारचें पितळ ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | **तांबें—** | | | | |
| | आस्ट्रेलियाचें ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ४० | ० | ,, |
| | सळ्या... ... ... ... ... | ,, | ४३ | ० | ,, |
| | ब्रेझियरचें व पत्रे ... ... ... ... | ,, | ४३ | ० | ,, |
| | चिनाई नाणें ... ... ... ... | ,, | ३२ | ० | ,, |
| | जपानचें ... ... ... ... | ,, | ३८ | ० | ,, |
| | खिळे व मिश्र धातूचे खिळे ... ... .... | ,, | ४३ | ० | ,, |
| | जुनें ... ... ... ... ... | ,, | ३८ | ० | ,, |
| | पाटे ज्यास हत्तिपगे ह्मणतात ते ... ... | ,, | ३८ | ० | ,, |
| | शीथिंग, पत्रे व तळ ... ... ... | ,, | ४५ | ० | ,, |
| | पाट, जाड व पातळ लाद्या आणि विटा ... | ,, | ३९ | ० | ,, |
| | चिनाई पांढरें तांब्याचें सामान ... ... | रतलास | १ | ० | ,, |
| | वर्ख किंवा दाकपान ... ... ... | १०० पानांस. | ३ | ० | ,, |
| | तार, फास्फर ब्रोंझनांवाच्या धातूच्या तारीसुद्धां ... | रतलास. | ० | ९ | ,, |

## परिशिष्ट ४ थें—(पुढें चालू).

### सामान्य जकात—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | | | रु. | आ. | |
| | **धातू व धातूच्या केलेल्या जिनसा—(पुढें चालू).** | | | | |
| | इतर सर्व प्रकारचें तांबें, तयार केलेलें व तयार न केलेलें ... ... ... ... | ... | किमतीवर. | | दर शेंकडा ९ टक्के. |
| | वर्ख सोन्याचा युरोपियन ... ... ... | १०० पानांस. | ३ | ० | " |
| | ,, चिनाई व खोटा ... ... .... | ... | किमतीवर. | | " |
| | **लोखंड—** | | | | |
| | नांगर व नांगराच्या सांखळा... ... ... | ... | किमतीवर. | | दर शेंकडा १ टक्का. |
| | आंगळ व टी ऐअर्न ... ... ... | टनास. | ११० | ० | " |
| | बाहालें व खांब व गर्डर्स, पुलाचें सामान व फक्त इमारती कामासाठीं आणलेलें इतर प्रकारचें लोखंडी सामान ... ... ... ... | ... | किमतीवर. | | " |
| | चपटें व चौरस व सळ्या, स्काटलंडचें सुद्धां ... | टनास. | ९० | ० | " |
| | गालवनैझ्ड, खिळ्यांशिवाय ... ... ... | हंड्रेडवेटास. | ९ | ८ | " |
| | ,, पत्रे व रिजिंग ... ... ... | " | ९ | ८ | " |
| | पट्टे, प्लेट व पत्रे, स्वीडीशशिवाय ... ... | टनास. | १२८ | ० | " |
| | खिळे, रोज व क्लास्प व चपटेमाथ्याचे रिव्हेट व वाशर ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ११ | ० | " |
| | खिळे इतर प्रकारचे, गालवनैझ्ड सुद्धां ... | ... | किमतीवर. | | " |
| | खिळे करावयाच्या सळ्या ... ... | टनास. | १०० | ० | " |
| | जुनें ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | २ | ० | " |
| | पाटे ... ... ... ... ... | टनास. | ५० | ० | " |
| | पैप व टयूब (नळ व नळ्या)... ... ... | ... | किमतीवर. | | " |
| | स्वयंपाकाचीं भांडीं ... ... .... | दाहाचे सेटास. | ४ | ९ | " |
| | ,, ,, ... ... ... | साहाचे सेटास. | २ | ९ | " |
| | सळ्या, गोल, स्वीडिश शिवाय, पराकाष्टा अर्धा इंच व्यासाहून अधिक नसणाऱ्या ... ... | टनास. | १०० | ० | " |
| | ,, अर्धे इंचाहून अधिक व्यासाच्या ... | " | ९० | ० | " |
| | स्विडिश, चपटें, चौरस, व सळ्या ... ... | " | १४९ | ० | " |
| | खिळे करावयाच्या स्वीडिश सळ्या .. ... | " | १७० | ० | " |
| | अर्ध्या इंचापेक्षां ज्यांचा व्यास जास्त नाहीं अशा स्वीडिश वाटोळ्या सळ्या... ... ... | " | १८० | ० | |
| | कल्हई केलेले पत्रे ... ... ... | हंड्रेडवेटास. | १० | ० | " |

## परिशिष्ट ४ थें—( पुढें चालू).

### सामान्य जकात—( पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | | | रु. | आ. | |
| | **धातू व धातूच्या केलेल्या जिनसा**—(पुढें चालू). | | | | |
| | इतर सर्व प्रकारच्या जिनसा, तारीसुद्धां परंतु रेलवेचें सामान ज्याची जकात माफ आहे तें खेरीज करून ... ... ... ... | ... | किमतीवर. | | दर शेंकडा १ टक्का. |
| | **लामेटा** (जरीची तार). | | | | |
| | दुहेरी गुंडाळीं ... ... ... ... | कोडीस. | ४ | ८ | दर शेंकडा ५ टक्के. |
| | एकेरी „ ... ... ... ... | ... | किमतीवर. | | „ |
| | **शिसें**— | | | | |
| | शिशाचे दगड, ग्यालेना .... ... ... | हंड्रेडवेटास. | १२ | ० | „ |
| | पाटे ... ... ... ... ... | „ | ९ | ८ | „ |
| | नळ्या ... ... ... ... ... | .... | किमतीवर. | | „ |
| | पत्रे, चाहाचे डबे करण्याचे ज्यांस जकात माफ आहे ते खेरीज करून ... ... ... | हंड्रेडवेटास. | १० | ० | „ |
| | **ओरसेड्यूचीं** व पितळेचीं पानें परमुलकाचीं. | | | | |
| | युरोपियन ... ... ... ... | रतलास. | १ | २ | „ |
| | चिनाई ... ... ... .. | „ | १ | ० | „ |
| | **पेटंट मेटलचे** किंवा यलोमेटलचे पत्रे व सळ्या... | हंड्रेडवेटास. | ३८ | ० | „ |
| | कित्ता कित्ता जुनें ... ... ... | „ | ३० | ० | „ |
| | **पारा** ... ... ... ... ... | रतलास. | १ | ६ | „ |
| | **छरे,** पाखरें मरण्याचे... ... ... ... | हंड्रेडवेटास. | १६ | ० | „ |
| | **चांदी अगर चांदीचें नाणें** हिंदुस्थान सरकारचें चालू नाणें ज्यास जकात माफ आहे तें खेरीज करून. | ... | किमतीवर. | | „ |
| | **पोलाद**— | | | | |
| | ब्लिस्टर्ड ... ... ... .. | हंड्रेडवेटास. | ७ | ० | दर शेंकडा १ टक्का. |
| | ब्रिटिश, आणि स्वीडिश खेरीज इतर परमुलकाचें... | ... | किमतीवर. | | „ |
| | क्यास्ट (ओतीव) ... ... .. . ... | ... | „ „ | | „ |
| | कमानी ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ७ | ० | „ |
| | स्वीडिश ... ... ... ... | „ | १३ | ० | „ |
| | इतर सर्व प्रकारचें पोलाद, रेलवेचें सामान ज्यास जकात माफ आहे तें खेरीज करून ... | ... | किमतीवर. | | „ |
| | **कथलाचे गोळे** ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ७० | ० | दर शेंकडा ५टक्के. |
| | कथलाचें बेगड चिनाई ... ... ... | रतलास. | ० | १२ | „ |
| | कथील इतर प्रकारचें ... ... .. | .... | किमतीवर. | | „ |

## परिशिष्ट ४ थें—( पुढें चालू).

### सामान्य जकात—( पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|
| | | | रु. आ. | |
| | **धातू व धातूच्या केलेल्या जिनसा** (पुढें चालू). | | | |
| | **जस्त**— | | | |
| | खिळे ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | २१ ० | दर शेंकडा ५ टक्के. |
| | प्लेट, व इतर आकृतींचें, नरम ... ... | ” | १६ ० | |
| | ” ” कडक... ... ... | ” | १३ ० | |
| | पत्रे. ... ... ... ... ... | ” | १८ ० | ” |
| | इतर सर्व प्रकारचें... ... ... ... | ... | किंमतीवर. | |
| | इतर सर्व प्रकारचे धातु, सोनें व सोन्याचें नाणें ज्यास जकात माफ आहे तें खेरीज करून. | ... | ” | ” |
| | तेलें. | | | |
| १२ | **तेलें**— | | | |
| | दालचिनीचें ... ... ... ... | रतलास. | ३ ० | ” |
| | खोबरेल ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | १३ ० | |
| | गवताचें .... ... ... ... | रतलास. | १ १२ | ” |
| | तिळांचें ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | १५ ० | ” |
| | अळशीचें युरोपियन ... ... ... | इंपीरियल ग्यालनास. | १ १२ | ” |
| | | | | ” |
| | अत्तरें सर्व प्रकारचीं ... ... ... | औंसास. | १० ० | ” |
| | **पिट्रोलियम**, ह्यांत नगतेलाचा, आणि ज्या प्रवाही पदार्थांस लोकांत राक आईल, रंगूनआइल बर्माआइल, केरोसीन, पाराफीनआइल, मिनरल-आईल, पिट्रोलाइन, ग्यासोलाइन, बेनझोल, बेंझोलाईन, बेनझाइन, अशीं नांवें आहेत त्यांचा, आणि पिट्रोलियम, दगडी कोळसा, शिस्ट, शेल, पीट, अगर इतर कोणत्याही बिटयुमेन विशिष्ट अशा पदार्थापासून अगर पिट्रोलियमपासून उत्पन्न झालेल्या कोणत्याही पदार्थापासून तयार केलेल्या कोणत्याही ज्वालाग्राही प्रवाही पदार्थाचा समावेश होतो. ... ... ... ... | इंपीरियल ग्यालनास. | ... | एक आणा. |
| | ” ज्याचा ज्वलनबिंदु फारनहीटच्या उष्णतामापक यंत्राच्या दोनशेंव्या अंशावर अगर त्याहून वरच्या अंशावर असेल, आणि जें सणाच्या किंवा इतर तंतुमय पदार्थाच्या चाक्या बसविण्यासाठीं अगर वंगणाच्या कारणांसाठीं असल्याबद्दल कस्टम्सच्या कलेक्टरची खात्री करण्यांत आलेली असेल, तें ... ... ... ... | ... | किंमतीवर. | दर शेंकडा ५ टक्के. |

## परिशिष्ट ४ थें—( पुढें चालू ).

### सामान्य जकात—( पुढें चालू ).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | | | रु. | आ. | |
| | तेलें—( पुढें चालू ). | | | | |
| | चंदनाचें ... ... .... ... | रतलास. | ८ | ० | दर शेंकडा ५ टक्के. |
| | टार्पिनटैन ... ... ... ... | इंपीरियल ग्यालनास. | १ | १४ | ,, |
| | व्हेलचें (स्पर्मसिटी खेरीज करून) व मासळीचें ... | हंड्रेडवेटास. | १९ | ० | ,, |
| | लांकडाचें ... .... ... ... | ,, | २९ | ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारचीं तेलें ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | **तयार केलेले व तयार न केलेले इतर पदार्थ.** | | | | |
| १३ | **पोशाक**, हेबरडाशरी ( बुतावें, सुया, सूत इत्यादि ) व मिलिनरी (स्त्रियांच्या टोप्या व वस्त्रें करण्याचें कापड, इत्यादि सामान ) व लष्करी व इतर युनिफार्म अकौटरमेंट सुद्धां परंतु कोणत्याही सरकारी नोकरानें स्वतःच्या उपयोगासाठीं आणिलेले बूट व शू (ह्याबद्दल नंबर ३९ पाहा) व युनिफार्म व अकौटरमेंट ज्यांस जकात माफ आहे, तीं खेरीज करून. | ... | ,, | | ,, |
| १४ | **ब्रश** सर्व प्रकारचे ... ... ... | ... | ,, | | ,, |
| १५ | **इमारतीसामान व इंजनियरी सामान** ह्मणजे आस्फाल्ट, सिमेंट सर्व प्रकारचें, मातीच्या पैप ( नळ ) व इतर प्रकार... ... ... ... | ... | ,, | | ,, |
| १६ | **पेट्या, खुर्च्या, टेबलें वगैरे घरकामाचें सामान...** | ... | किमतीवर. | | ,, |
| १७ | **मेणबत्त्या**— | | | | |
| | प्याराफैनच्या ... ... ... ... | रतलास. | ० | ५ | ,, |
| | स्पर्मासिटीच्या ... ... ... .. | ,, | ० | ६ | ,, |
| | मेणाच्या ... ... ... ... | ,, | १ | ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारच्या, इतर पदार्थ मिश्र करून केलेल्या सुद्धां ... ... ... ... | ,, | ० | ५ | ,, |
| १८ | **वेत व वेताचे केलेले पदार्थ व टोपल्या वगैरे**— | | | | |
| | वेत मलाक्काचे ... ... ... ... | डजनास. | १ | ० | ,, |
| | वेत ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ७ | ० | |
| | इतर सर्व प्रकारचे, साधारण बांबूंवरची जकात माफ आहे ते खेरीज करून ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| १९ | **गाड्या** व त्यांचे निरनिराळे भाग रेलवेच्या गाड्या व ट्रक ज्यांची जकात माफ आहे ते खेरीज करून ... | ... | ,, | | ,, |
| २० | **चिनाई व जपानचीं मातीचीं भांडीं,** लाख चढविलेले मातीचे भांड्यांसुद्धां, परंतु अर्थनवेर व चैना व | | | | |

## परिशिष्ट ४ थें—(पुढें चालू).

### सामान्य जकात—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|
| | **तयार केलेले व तयार न केलेले इतर पदार्थ**—(पुढें चालू). | | रु. आ. | |
| | पोर्स्लेन (ह्यासाठीं नंबर २६ पाहा) खेरीज करून ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास | किमतीवर. | दर शेंकडा ५ टक्के. |
| २१ | **क्लाक व वाचें** व इतर प्रकारचीं घड्याळें ... | ... | ,, | ,, |
| २२ | **काथ्या व काथ्याचे केलेले पदार्थ** काथ्याचे केलेले तारवाचे दोरव इतर दोर खेरीज करून (ह्यासाठीं नंबर २४ पहा)— | | | |
| | यार्न सर्व जातीचें ... ... ... | हंड्रेडवेटास. | ९ ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे पदार्थ ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| २३ | **पोवळीं खरीं** ... ... ... ... | ... | ,, | ,, |
| २४ | **चन्हाटें व दोर** झाडपाल्याचे तंतूचे केलेले— | | | |
| | काथ्याचे तारवाचे दोर, टार लावलेले ... ... | हंड्रेडवेटास. | १० ० | ,, |
| | काथ्याचें दोर ... ... ... ... | ,, | १० ० | ,, |
| | चन्हाट सणाचें युरोपियन ... ... ... | ,, | २५ ० | ,, |
| | ,, ,, मनिलाचें ... ... ... | ,, | ३० ० | ,, |
| | सुतळ शिडाची युरोपियन ... ... ... | रतलास. | ० ८ | ,, |
| | इतर सर्व प्रकारचीं चन्हाटें व दोर ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| २५ | **बूच** व बुचाचे केलेले पदार्थ— | | | |
| | बाटल्यांचें बूच ... ... ... ... | ग्रोसास. | १ ० | ,, |
| | शिश्यांचे (कुप्यांचे) बूच ... ... ... | ,, | ० ४ | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे ... ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| २६ | **मातीचें सामान** ( मातीचे पैप ह्मणजे नळ खेरीजकरून; ह्यासाठीं नंबर १९ पहा ) व चैना ( चिनाई भांडीं ) व चिनाई माती व पोर्स्लेन ... ... ... ... | ... | ,, | ,, |
| २७ | **पिस** ... ... ... ... ... | ... | ,, | ,, |
| २८ | **दारूकाम**— | | | |
| | चिनाई ... ... ... ... | १३३⅓ रतलांचे पेटीस. | ३५ ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारचें ... ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| २९ | **सण व सणाचे केलेले पदार्थ**—सणाचे दोऱ्यासुद्धां ... ... ... ... ... | ... | ,, | ,, |
| ३० | **कांच** व कांचूकाम व मणी व खोटीं मोत्यें व खोटीं पोवळीं— | | | |
| | बांगड्या कांचेच्या चिनाई मुलामेदार ... ... | १०० जोड्यांस | १५ ० | ,, |
| | ,, ,, ,, वगर मुलाम्याच्या ... | ,, | ३ ० | ,, |

## परिशिष्ट ४ थें—(पुढें चालू).

### सामान्य जकात—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|
| | तयार केलेले व तयार न केलेले इतर पदार्थ—(पुढें चालू) | | रु. आ. | |
| | मणी चिनाई ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ३६ ० | दर शेंकडा ५ टक्के. |
| | पोंवळीं खोटीं ... ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| | कांच चिनाई सर्व रंगांची ... ... ... | १३३⅓ रतलास. | ३२ ० | ,, |
| | ,, तावदानाची रंगित ... ... ... | १०० चौरस फुटांस. | १४ ० | ,, |
| | ,, ,, लहानमोठी ... ... | ,, | ६ ८ | ,, |
| | मोत्यें खोटीं— | | | |
| | बाजरिया ... ... ... ... | लाखास. | ३ ० | ,, |
| | बोरिया ... ... ... ... | हजारास. | १ ० | ,, |
| | जुवारया ... ... ... ... | लाखास. | ५ ० | ,, |
| | लोलक... ... ... ... ... | हजारास. | ० १२ | ,, |
| | नथिया.... ... ... ... ... | ,, | ० ३ | ,, |
| | टांचिया... ... ... ... ... | ,, | १ ० | ,, |
| | बटाणिया ... ... ... ... | लाखास. | १० ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे मणी व खोटीं मोत्यें व कांचा व कांचेचें सामान... ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| ३१ | गुंद, गमरेजिन, व गुंद अगर गमरेजिन ह्यांचे केलेले पदार्थ— | | | |
| | चंद्रुस ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ५६ ० | ,, |
| | कात ... ... ... ... ... | ,, | १७ ० | ,, |
| | गम, आमोनियाक ... ... ... ... | ,, | १४ ० | ,, |
| | ,, आरेबिक ... ... ... ... | ,, | १८ ० | ,, |
| | ,, बडेलियम (साधा डिंक) ... ... | ,, | १० ० | ,, |
| | ,, लोबान किंवा ऊद ... ... ... | ,, | ४० ० | ,, |
| | ,, बैशाबोळ ... ... ... ... | ,, | १४ ० | ,, |
| | ,, कवड्या लोबान ... ... ... | ,, | १२ ० | ,, |
| | ,, इराणी (खोटा) ... ... ... | ,, | १० ० | ,, |
| | ,, किनो ... ... ... ... | ,, | १० ० | ,, |
| | हिरा बोळ ... ... ... ... | ,, | ४० ० | ,, |
| | रोजिन (राळ) ... ... ... ... | ,, | ४ ४ | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे गुंद, राळी, व गुंदाचे अगर राळीचे केलेले पदार्थ ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| ३२ | ताग व तागाचे केलेले पदार्थ— | | | |
| | कापड व इतर सर्व पदार्थ, दोर खेरीज करून (ह्यासाठीं नंबर २४ पाहा). ... ... ... | ... | ,, | ,, |

## परिशिष्ट ४ थें—( पुढें चालू).

### सामान्य जकात—( पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|
| | **तयार केलेले व तयार न केलेले इतर पदार्थ—( पुढें चालू ).** | | | |
| ३३ | **चामडीं व कातडीं** (कच्चीं किंवा मीठ लावलेलीं चामडीं व कातडीं ज्यांची जकात माफ आहे तीं खेरीज करून)— | | | |
| | चामडीं— | | | |
| | बार्डर ... ... ... ... | दर एकास. | ३२ ० | दर शेंकडा ५ टक्के. |
| | म्हशीचीं ... .... ... ... | कोडीस. | ८० ० | ,, |
| | गाईचीं ... ... ... ... | ,, | ६० ० | ,, |
| | कातडीं सर्व प्रकारचीं ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| ३४ | **यंत्रें व मंच—** | | | |
| | वाद्यें, चित्रें काढण्याचीं, मोजण्याचीं, दर्शनानुशासन शास्त्रसंबंधी, फोटोग्राफीचीं ( फोटोग्राफ काढण्याचे पदार्थांसुद्धां ), सर्वेचीं, शस्त्रवैद्यकीचीं ( शस्त्र वैद्यकीचे सामानासुद्धां ) ... ... ... | ... | ,, | ,, |
| ३५ | **हस्तिदंत व हस्तिदंताच्या जिनसा—** | | | |
| | घांट न घडलेल्या— | | | |
| | हत्तीच्या दाढा... ... ... ... | हंड्रेडवेटास. | १२५ ० | ,, |
| | हस्तिदंत (पोंकळ भाग, मध्यभाग व अणीकडचा भाग खेरीज करून) प्रत्येक २० रतलांहून अधिक वजनाचा, आणि पोकळ भाग, मध्यभाग, व अणीकडचे भाग, प्रत्येक १० रतल व १० रतलांहून जास्त वजनाचा .... ... ... | ,, | ८०० ० | ,, |
| | हस्तिदंत ( पोंकळ भाग, मध्यभाग व अणीकडचा भाग खेरीज करून ) प्रत्येक १० रतलांहून कमी नाहीं व २० रतलांहून अधिक नाहीं असा, आणि पोंकळ भाग, मध्यभाग, व अणीकडचे भाग, प्रत्येक १० रतलांहून कमी अशा वजनाचा ... ... | ,, | ६८० ० | ,, |
| | हस्तिदंत (पोंकळ भाग, मध्यभाग, व अणीकडचा भाग खेरीज करून) प्रत्येक १० रतलांहून कमी वजनाचा. | ,, | ५२५ ० | ,, |
| | दर्यांतील जनावरांचे दांत ज्यांस महींदंत ह्मणतात ते, प्रत्येक ४ रतलांहून कमी वजानाचा नाहीं असा . | ,, | १७५ ० | ,, |
| | दर्यांतील जनावरांचे दांत ज्यांस महींदंत म्हणतात ते, प्रत्येक ३ रतलांहून कमी नाहीं व ४ रतलांहून कमी अशा वजनाचा. ... ... | ,, | १७० ० | ,, |
| | दर्यांतील जनावरांचे दांत ज्यांस महींदंत म्हणतात ते, प्रत्येक ३ रतलांहून कमी वजनाचा ... ... | ,, | १३० ० | ,, |
| | हस्तिदंताच्या केलेल्या जिनसा ... ... | ... | किमतीवर. | ,, |

## परिशिष्ट ४ थें—( पुढें चालू).

### सामान्य जकात—( पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | **तयार केलेले व तयार न केलेले इतर पदार्थ—** ( पुढें चालू ). | | रु. | आ. | |
| ३६ | **जडावाचे दागिने,** रुप्याचे भांड्यांसुद्धां— | | | | |
| | रुप्याचीं भांडीं साधीं } युरोपियन खेरीज इतर ... | तोळ्यास. | १ | ० | दर शेंकडा ५ टक्के. |
| | ,, नकसीदार. } ... | ,, | १ | ४ | |
| | इतर सर्व प्रकारचीं, न बसविलेलें जवाहीर व मोतें ज्यांची जकात माफ आहे तीं खेरीज करून ... | ... | किमतीवर. | | ,, |
| ३७ | **ज्यूटचे** पदार्थ ... ... ... ... | ... | ,, | | ,, |
| ३८ | **लाख** सर्व प्रकारची ... ... ... ... | ... | ,, | | ,, |
| ३९ | **कमावलेलें कातडें व कमावलेल्या कातड्याचे केलेले पदार्थ,** बूट व शू व हार्नीस व जीन यांसुद्धां परंतु यंत्रें चालविण्यासाठीं चामड्याचे पट्टे येतात ज्यांची जकात माफ आहे ते खेरीज करून ... | ... | ,, | | ,, |
| ४० | **मरीन** व आरमारी सामान, इतर रीतीनें वर्णन न केलेलें असें ... ... ... ... | ... | ,, | | ,, |
| ४१ | **आगकाड्या,** लुसिफर व इतर सर्व प्रकारच्या ... | ... | किमतीवर. | | ,, |
| ४२ | **हांतऱ्या—** | | | | |
| | जमिनीवर हांतरावयाच्या चिनाई व सिंगापुरी, सर्व प्रकारच्या ... ... ... ... | शंभरांस. | ७५ | ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारच्या, काथ्याच्या हांतऱ्या खेरीज करून ( ह्यासाठीं नंबर २२ पाहा ) ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| ४३ | **आइलक्लाथ व फ्लोरक्लाथ.** | .... | ,, | | ,, |
| ४४ | **रंग, चितान्याचें सामान** व कमावलेल्या कातड्यांस व धातूंस लावण्यासाठीं कांपोजिशन (बनावलेले रंग)— | | | | |
| | गेरू, युरोपियन खेरीज इतर, सर्व रंगांचा ... | हंड्रेडवेटास. | १ | ८ | ,, |
| | रंग सर्व प्रकारचे ... ... ... ... | ,, | ९ | ० | ,, |
| | कांपोजिशन पेंट ... ... ... ... | ,, | ९६ | ० | ,, |
| | पेंट पेटंट ड्रायर्स ... ... ... ... | ,, | १० | ० | ,, |
| | प्रशियनब्लू ( आसमानीरंग ) चिनाई ... ... | रतलास. | ० | १० | ,, |
| | ,, ,, ,, युरोपियन ... | ,, | १ | ० | ,, |
| | शेंदूर ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | १२ | ० | ,, |
| | टर्पेंटैन ... ... ... ... | इंपीरियल ग्यालनास | १ | १४ | ,, |
| | जंगल ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ७० | ० | ,, |
| | हिंगुळ, कनतानचा ... ... ... | ९० पुड्यांचे पेटीस. | ९४ | ० | ,, |
| | सफेदा... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | १४ | ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |

## परिशिष्ट ४ थें—(पुढें चालू).

### सामान्य जकात—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|
| | **तयार केलेले व तयार न केलेले इतर पदार्थ—(पुढें चालू).** | | रु. आ. | |
| ४५ | **कागद**—सर्व प्रकारचे ... ... .. | ... | किमतीवर. | दर शेंकडा ५ टक्के. |
| ४६ | **सुगंधी पदार्थ—** | | | |
| | गुलाबाचीं फुलें सुकीं ... ... ... | हंड्रेडवेटास. | १२ ० | ,, |
| | गुलाब पाणी ... ... ... ... | इंपिरियल ग्यालनास. | १ १४ | ,, |
| | इतर सर्व प्रकारचे, सुगंधी स्पिरिट (ज्यासाठीं परिशिष्ट ३ पाहा) खेरीजकरून ... ... | .. | किमतीवर. | ,, |
| ४७ | **कापड**, ज्याचा इतर रीतीनें तपशील लिहिला नाहीं तें, कापसाचें कापड, ज्यावर जकात माफ आहे, तें खेरीजकरून ... ... ... ... | ... | ,, | ,, |
| ४८ | तंबाकू ओढण्यांत ज्या नळ्यांचा व इतर साधनांचा उपयोग करतात त्या नळ्या व इतर साधनें ... | ... | ,, | ,, |
| ४९ | **पिच व टार व डामर—** | | | |
| | बिच्युमेन ... ... ... ... | ... | ,, | ,, |
| | डामर ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ६ ० | ,, |
| | पिच अमेरिकन व युरोपियन. | ,, | ६ ० | ,, |
| | कोल पिच ... ... ... ... | ,, | २ ८ | ,, |
| | टार अमेरिकन व युरोपियन... ... ... | ,, | ६ ० | ,, |
| | कोल टार ... ... ... ... | ,, | २ ८ | ,, |
| | खनिज टार ... ... ... ... | ,, | किमतीवर. | ,, |
| ५० | **बीं—** | | | |
| | एरंड्या ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ४ ८ | ,, |
| | जिरें ... ... ... ... ... | ,, | १७ ० | ,, |
| | ,, काळें ... ... ... ... | ,, | ६ ० | ,, |
| | अळशी ... .... ... . | ,, | ५ ८ | ,, |
| | मेंथी ... ... ... ... ... | ,, | ४ ० | ,, |
| | मोहऱ्या किंवा शिरस ... ... ... | ,, | ५ ० | ,, |
| | खसखस ... ... ... ... | ,, | ६ ० | ,, |
| | बेदाणा ... ... ... ... | ,, | ४५ ० | ,, |
| | शाहाजिरें ... ... .. .. | ,, | २२ ० | ,, |
| | तीळ ... ... ... ... ... | ,, | ७ ८ | ,, |
| | इतर सर्व प्रकारचें... ... ... ... | ... | किमतीवर. | ,, |
| ५१ | **शिंप्या व कवड्या—** | | | |
| | शंख मोठे क्यामिओसाठीं ... ... ... | शेंकडा. | ६ ८ | ,, |

## परिशिष्ट ४ थें—(पुढें चालू).

### सामान्य जकात—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|---|
| | **तयार केलेले व तयार न केलेले इतर पदार्थ—** (पुढें चालू). | | रु. | आ. | |
| | शंख, पांढरे जिवंत ... ... ... | शेंकडा. | ७ | ० | दर शेंकडा ५ टके. |
| | ,, ,, मेलेले ... ... ... ... | ,, | ४ | ० | ,, |
| | कवडे. ... ... ... ... ... | ,, | ० | ८ | ,, |
| | कवड्या बाजारी साधारण ... ... ... | हंड्रेडवेटास. | ३ | ० | ,, |
| | ,, मालदीवच्या... ... ... ... | ,, | ७ | ८ | ,, |
| | ,, नखला ... ... ... ... | ,, | ६५ | ० | ,, |
| | ,, संखळी ... ... ... .. | ,, | ६० | ० | ,, |
| | ,, पिवळ्या उंच प्रतीच्या ... ... ... | ,, | २ | ८ | ,, |
| | मोत्यांचे शिंपे, नाकर ... ... ... | ,, | ३० | ० | ,, |
| | कचकडा ... ... ... ... | ,, | ७ | ० | ,, |
| | ,, नख ... ... ... ... | ,, | १ | ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारच्या ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| ५२ | **रेशीम व रेशमाचें केलेले जिन्नस—** | | | | |
| | मोकळें चिकन भरण्याचें (फ्लास) ... ... | रतलास. | ९ | ० | ,, |
| | कापड... ... ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| | कच्चें रेशीम— | | | | |
| | चहारमचें व कोचीन चैनाचें व पिवळें शांघाई ... | रतलास. | ५ | ४ | ,, |
| | माथींचें ... ... ... ... | ,, | ३ | ४ | ,, |
| | चिनाई इतर जातीचें .. ... ... | ,, | ७ | ० | ,, |
| | कचरा व गाळ ... ... ... ... | ,, | १ | २ | ,, |
| | पंजमचें ... ... ... ... | ,, | २ | ० | ,, |
| | इराणी... ... ... ... ... | ,, | ४ | ४ | ,, |
| | सयामचें ... ... ... ... | ,, | २ | ० | ,, |
| | टासर अगर इतर जंगली किड्यांपासून उत्पन्न झालेलें ... ... ... ... | ,, | २ | ८ | ,, |
| | शिवायचा दोरा चिनाई ... ... ... | ,, | ९ | ० | ,, |
| | इतर सर्व प्रकारचें रेशीम ... ... ... | ... | किमतीवर. | | ,, |
| ५३ | **साबू** ... ... ... ... ... | ... | ,, | | ,, |
| ५४ | **स्टेशनरी**, कागद शिवाय करून (कागदांबद्दल नंबर ४१ पाहा.) | ... | ,, | | ,, |
| ५५ | **साधे व संगमरवरी दगड** ... ... ... | ... | ,, | | ,, |
| ५६ | **चरबी** ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास | २५ | ० | ,, |

## परिशिष्ट ४ थें—(पुढें चालू).

### सामान्य जकात—(पुढें चालू).

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येक. | तारिफाप्रमाणें किंमत. | जकातीचा दर. |
| --- | --- | --- | --- | --- |
| | **तयार केलेले व तयार न केलेले इतर पदार्थ— ( पुढें चालू ).** | | रु. आ. | |
| ९७ | शृंगाराचें सामान ज्याचा इतर रीतीनें तपशील लिहिला नाहीं तें ... ... ... .. | ... | किंमतीवर. | दर शेंकडा ५ टक्के. |
| ९८ | **खेळणीं** व सर्व प्रकारचे खेळ खेळण्यास जरूर असणारें सामान ... ... ... ... | ... | " | " |
| ९९ | **छत्र्या,** सुती, २० इंचांहून कमी ... ... | प्रत्येकीं. | ० १० | " |
| | " " २० इंचांच्या व जास्त मोठ्या ... | " | १ ० | " |
| | " " रेशमी, युरोपियनशिवाय इतर ... | " | ० ९ | " |
| | " " इतर सर्व प्रकारच्या, कागदी छत्र्या धरून ... ... ... | ... | किंमतीवर. | " |
| ६० | **मेण** ... ... ... ... ... | हंड्रेडवेटास. | ३२ ० | " |
| ६१ | **लांकूड व इमारतीचें लांकूड,** रेल्वे स्लीपर व सर्पण ज्यास जकात माफ आहे तें खेरीज करून ... | ... | किंमतीवर. | " |
| ६२ | **लोंकरीचा माल—** | | | |
| | लोंकरीचे दोरे ... ... ... ... | ... | " | " |
| | होजियरी ( मोजे वगैरे.) ... ... ... | | | |
| | कापड ... ... ... ... ... | | | |
| | इतर सर्व प्रकारचा माल ... ... ... | | | |

## परिशिष्ट ५ वें.

### देशाबाहेर जाणाऱ्या मालाचें तारीफ.

| पदार्थाचें नांव. | जकातीचा दर. |
| --- | --- |
| तांदूळ, भात व तांदुळांचें पीठ. | ८२$\frac{२}{७}$ अवार्डुपाइज रतलांच्या दरमणास तीन आणे. |

(सही) **एस्. हार्वे जेम्स,**
**सेक्रेटरी निसबत हिंदुस्थानसरकार.**

(True Translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.